ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 80 Licence No. 175

वर्ष ३२ | पुणे, बुधवार २ मार्च. १६९६ | अंक ५

SCG-1 HIN

## नहीं—
## यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: 1. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई 1.

फोन : कार्यालय : २५३३७२ कारखाना : ७६...

# विविध माहिती

**कॅन्सरसंबंधी संशोधनकेंद्रे**—मध्यवर्ती सरकारच्या आरोग्य-मंत्री डॉ. सुशीला नय्यर ह्यांनी असे जाहीर केले आहे की, ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात भारतात कॅन्सर रोगाविषयी संशोधन करणारी ४ केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत. ह्या केंद्रांत संशोधकांना शिक्षण देण्याचीही व्यवस्था होणार आहे. ४ केंद्रांपैकी एकेक केंद्र अहमदाबाद, कलकत्ता आणि मद्रास ह्या ठिकाणी स्थापन करण्यात यावयाचे आहे. ४ थ्या केंद्राची जागा अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही.

**हंगेरीकडून भारताला मिळणारी मदत**—हंगेरीकडून भारताला अनेक क्षेत्रांत आर्थिक आणि तांत्रिक मदत मिळत आहे. मध्यप्रदेशांतील कोर्बा खाणीनजीक बांधण्यात येणारा अल्युमिनिमचा कारखाना हंगेरीच्या मदतीने उभारण्यात येत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील काही महत्त्वाची विकासाची कामे करण्यासाठी भारताला १२ कोटी रुपयांचे कर्ज हंगेरीकडून मिळालेले आहे. त्याचप्रमाणे उभयता देशांतील व्यापाराची वृद्धी करण्यासाठी ५ वर्षे मुदतीचा एक करारही करण्यात आलेला आहे. कापडाच्या धंद्यासंबंधीची एक संपूर्ण प्रयोगशाळा हंगेरीने दिली असून ती मुंबईच्या कापड संशोधन संघटनेत उपयोगात आणली जात आहे.

**दुधाच्या भुकटीची खराबी**—१९६२ साली आणीबाणीच्या परिस्थितीत अमेरिकेकडून मागविण्यांत आलेली ४,१४१ टन दुधाची भुकटी खराब झाल्याचे आढळून आले. ही भुकटी ज्या डब्यांतून मागविण्यात आली त्यांच्या पेट्या व्यवस्थित बांधण्यात आलेल्या नव्हत्या. त्यामुळे बरेचसे डबे फुटले. वॉशिंग्टन येथील भारतीय पुरवठा अधिकाऱ्यांनी ह्या बाबतीत योग्य ती काळजी घेतली नाही, आणि त्यामुळे भारताचे ४८ लाख रुपयांचे नुकसान झाले अशी माहिती पब्लिक अकौंट्स कमिटीने नमूद केली आहे.

**संरक्षण प्रदर्शनाला गर्दी**—जयपूर येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी संरक्षण साहित्याचे एक प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्रदर्शनाला तिन्ही दिवस खूप गर्दी होत असे. प्रदर्शनाच्या प्रवेशद्वारापाशी शेकडो ग्रामीण नागरिक रांगेने आत जाण्यासाठी उभे असत. संरक्षणसामग्रीच्या उपयोगाबद्दल प्रदर्शनातील जवानांना ते अनेक प्रश्न विचारीत असत.

**धान्य पाठविण्याची धावपळ**—अमेरिकेकडून भारताला पाठविण्यात येणारे धान्य पाठविण्यासाठी धावपळ सुरू झाली आहे. धान्य वाहून ते अटलांटिक समुद्रावरील बंदरांपर्यंत पोचविण्यासाठी खास गाड्या सोडण्यात येणार आहेत. त्यासाठी नेहमीपेक्षा अधिक धान्य मावणारे माल डबे वापरण्यात यावयाचे आहेत. १९६५ साली भारताने ६० लाख टन अन्नधान्य आयात केले. १९६६ साली आयात दुप्पट होईल.

**धान्यगुदामासाठी कर्ज**—पूर्व पाकिस्तानात अन्नधान्य साठविण्याची गुदामे बांधण्यासाठी पाकिस्तानला २-४ कोटी डॉलर्सचे परदेशीय कर्ज मिळणार आहे. त्यापैकी ४८ लाख डॉलर्सचे कर्ज स्वीडनकडून २ टक्के व्याजाच्या दराने मिळणार असून बाकीचे आंतरराष्ट्रीय विकास संघटनेकडून मिळणार आहे. विकास संघटनेकडून मिळणाऱ्या कर्जावर व्याज घेण्यात येणार नाही. त्याची परतफेड ५० वर्षांच्या मुदतीत करावयाची आहे.

**कोसिजिन ह्यांना नोबेल पारितोषिक द्या**—रशियाचे पंतप्रधान मि. कोसिजिन ह्यांनी भारत व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यानची ताश्कंद घोषणा घडवून आणण्याबाबत खूप परिश्रम घेतले आहेत. म्हणून त्यांना शांततेबद्दलचे नोबेल पारितोषिक देण्यात यावे अशी सूचना श्री. राजगोपालाचारी ह्यांनी केली आहे. अशा प्रकारचे एकमत फक्त रशियाच घडवून आणू शकला असता, असेही मत त्यांनी व्यक्त केले आहे.

**संततिनियमनाच्या साधनांचा कारखाना**—केरळमध्ये त्रिवेंद्रमजवळ संततिनियमनाची साधने तयार करणारा एक कारखाना अमेरिकेच्या मदतीने उभारण्यात येत आहे. १९६७ च्या अखेरीस त्यात उत्पादनास प्रारंभ करण्यात येईल. पहिल्या वर्षी कारखान्यात १४·४ कोटी साधने निर्माण करण्यात येतील. ह्या साधनांचे वितरण कुटुंबनियोजन केंद्रांमार्फत करण्यात येईल.

**इटालीच्या लोकांची मदत**—इटालीचे अध्यक्ष आणि पोप पॉल ह्यांनी भारतामधील दुष्काळग्रस्त लोकांना इटालीतील लोकांनी मदत द्यावी अशी विनंती केली होती. ही विनंती इटालीच्या रेडिओवरून प्रसृत करण्यात आल्यावर इटालीमधील सर्व थरांतील लोकांनी मदत देण्यास प्रारंभ केला. मदतीचा आकडा हिंदी चलनात २·३ कोटी रुपयांपर्यंत पोचला.


**बॅबिलोनियन मनी...**

बॅबिलोनियन मनी या गोष्टींत 'शकेल' 'मिना' व 'टॅलन्ट' चा उल्लेख आढळतो. वास्तविक ही वजनाची नावे. गव्हाचे १८० दाणे म्हणजे एक 'शकेल,' एक 'मिना' म्हणजे साठ 'शकेल'. मिनाच्या जवळजवळ ६० पट म्हणजे 'टॅलन्ट'. 'पैशाच्या' इतिहासाची गोडी असलेले याहून अधिक माहिती मिळवू शकतील. तुम्हांआम्हांला आपल्या पैशाचे सर्व व्यवहार करणारी चांगली बँक ठाऊक असली तरी पुरे. अशा बँकांमध्ये जेथे अवश्य व्यवहार करावा अशी बँक म्हणजे...

*** दि बेळगांव बँक लिमिटेड ***

[ शेड्यूल्ड बँक ]

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.

म्हैसूर, महाराष्ट्र व गोमांतकात मिळून ३८ शाखांचे जाळे.

# अर्थ

बुधवार, २ मार्च, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परदेशी मदतीचे इंजेक्शन
### दरिद्री देशांवर गुण का दाखवीत नाही?
### आमूलाग्र फेरविचाराची आवश्यकता

परदेशी मदतीमुळे अविकसित देशांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होत आहे काय? असा मूलग्राही प्रश्न आता उपस्थित झाला आहे. अंतर्गत स्थिरता, पोटापुरते मिळण्याची शक्यता, प्रगतीच्या दिशेने चालना, इत्यादि दृष्टीने अविकसित देशांची काय परिस्थिती आहे? ती मुळीच समाधानकारक नाही, असेच दिसून येते. कुठल्या तरी देशात दंगे झाले नाहीत, क्रांती झाली नाही, आंतरराष्ट्रीय युद्ध सुरू झाले नाही, असा एक महिनाही जात नाही. जेथे राजकीय स्थिरता आढळते, तेथेही अन्न, परदेशीय चलन, ह्या बाबत आणीबाणीचीच परिस्थिती आहे; भरमसाठ चलनवाढ होत आहे; आर्थिक आरोग्याला विघातक अशीच ही सर्व लक्षणे आहेत.

दर वर्षी शेकडो कोटी डॉलर्सची परराष्ट्रीय मदत दिली जात असताही त्याचा अपेक्षित सुपरिणाम कुठेच दिसून येत नाही. मार्शल प्लॅनखालील मदतीने युरोपातील देशांनी आपली आर्थिक घडी नीट बसविली, पण विकसनशील देशांवर परदेशीय मदतीच्या इंजेक्शनांचा काहीच कसा परिणाम होत नाही?

मदत देणाऱ्या सर्व देशांत हे प्रश्न विचारले जात आहेत आणि त्यांची उत्तरे अगदी नव्या दृष्टिकोणाची आवश्यकता प्रतिपादन करीत आहेत. आर्थिक विकासाचा प्रश्न हा आर्थिक स्वरूपाचा असून पैशांनी तो सोडविता येण्याजोगा असतो, हे धरून चालणे वावगे नाही. परंतु विकासाची मुळे त्यापेक्षा खोलवर जायला हवीत—शैक्षणिक, मानसिक, राजकीय भूमीत ती रुजायला हवीत, हे विसरून कसे चालेल? कामगारांचा तुटवडा आणि भांडवलाचा भरपूर पुरवठा अशा परिस्थितीतील श्रीमंत देशांनी अवलंबिलेले तंत्र बेकारांनी गजबजलेल्या आणि भांडवलाचा तुटवडा असलेल्या गरीब देशांनी अवलंबिणे त्यांच्या दीर्घकालीन हिताचे होईल असे मानणे कितपत योग्य होईल? घाईने असे तंत्र अवलंबिल्याने परंपरागत परिस्थिती मात्र बिघडते आणि नवीन फारसे साधत नाही असे सावकार देशांना वाटू लागले आहे. मोठ्या प्रमाणावर निर्माण होणारी बेकारी, शहरांतील गलिच्छ वस्त्यांची वाढ, खेडेगावी जीवन उद्ध्वस्त होण्याची प्रवृत्ती, ह्या सर्व गोष्टींना "तात्कालिक अडचणी" किंवा "विकासाच्या काळातील अनिवार्य वेदना" मानून त्याकडे दुर्लक्ष करणे हे वस्तुस्थितीस सोडून होईल, अशा विचारसरणीचा पाश्चात्त्य देशांत प्रभाव पडू लागला आहे.

मदत देणाऱ्या देशांपेक्षा मदत मिळणाऱ्या देशांनीच ह्या बाबतीत जास्त काळजीपूर्वक फेरविचार करण्याची पाळी आली आहे. "आम्ही अविकसित देशांना हुकूम सोडू शकत नाही" असे सावकार देशांनी म्हणावे आणि "सावकार देशांतील तंत्र अवलंबिणे त्या देशांच्या विचारसरणीला धरून असल्याने आम्ही त्याप्रमाणे चालतो" असे ऋणको देशांनी म्हणून मुख्य प्रश्न डावलणे, एकमेकांच्या पाठीशी दडणे, हे घातक ठरणार आहे.

जनतेचा सर्वांगीण विकास साधावयाचा असेल तर जनताच विकासकार्यात प्रत्यक्ष सहभागी व्हायला हवी; सामान्य जनतेपासून फारकत झालेल्या, वरिष्ठ ठिकाणच्या काही लोकांनी पंचवार्षिक योजनांचा खेळावयाचा तो खेळ नव्हे. पण जिथे बेकारी नंगा नाच घालत आहे, तिथे लोक विकासकार्यात प्रत्यक्ष भाग कसा घेऊ शकणार? व्यापक बेकारीच्या परिस्थितीत विकासाचा प्रयत्न करणे म्हणजे नदीच्या प्रवाहात कपडे वाळविण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे.

सर्वांना पुरेसे काम असल्याशिवाय विकास संभवत नाही, हे एकदा मान्य केल्यावर काही थोड्या मोठ्या योजनांची कास धरण्यापेक्षा देशभर, जनतेशी संबंध येणाऱ्या लहानलहान विकेंद्रित योजनांवर भर देणे क्रमप्राप्तच ठरते. लहान लहान अशा असंख्य योजनांपेक्षा प्रचंड अशा थोड्याशाच योजना सावकार देशांना मदतीच्या रकमेच्या विनियोगाच्या दृष्टीने सोप्या वाटतात. सध्याच्या दारिद्र्याच्या प्रचंड विस्तारांत श्रीमंतीच्या सुखसोई गरीबांना मिळवून देणें देशाला परवडणार नाही ह्याची जाणीव, ही अगदी मूलभूत जरूरीची गोष्ट आहे.

अविकसित देशांतील लोकांना प्रत्येक गोष्टीचीच वाण आहे. अन्न, वस्त्र, फर्निचर, भांडीकुंडी, साबण, कागद, इत्यादि सर्वच गोष्टींचा तुटवडा आहे. शेतीच्या कामाला लागणारी अवजारे त्यांचेजवळ नाहीत; काढलेले पीक साठविण्याच्या सोई नाहीत; राहायला घरे नाहीत; घरबांधणीची साधने उपलब्ध नाहीत.

ह्या सर्व गोष्टी, फार थोडे अपवाद वगळता, ते स्वतःच करू शकतील. मग ते का करीत नाहीत, हा खरा मुद्याचा प्रश्न आहे. आधुनिक उत्पादनाच्या पद्धतींनी त्यांचे डोळे दिपून गेलेले आहेत. नव्या उत्पादनपद्धतींचे ज्ञान, भरपूर भांडवल, मोठ्या प्रमाणावर उत्पादन, विक्रीची कार्यक्षम व्यवस्था, कर्जपुरवठा, इत्यादि शेकडो गोष्टी खेडेगावातील गरीबांच्याच नव्हे तर त्यांतील श्रीमंत गणल्या गेलेल्यांच्याही आवाक्यापलीकडच्या आहेत. त्यामुळे ते सर्वजण आपण काहीच करू शकत नाही अशा कल्पनेने बसून राहिले आहेत.

श्रीमंतांच्या साधनसामग्रीची आवश्यकता नसणाऱ्या पद्धतीचा त्यांनी अवलंब करायला काय हरकत आहे? त्याचे उत्तर द्यावयास जितके सोपे तितकेच ते निरुत्साह निर्माण करणारे आहे. परदेशांची सर्व मदत मोठ्या, मध्यवर्ती प्रकल्पांवर खर्च होते—मोठाले बंधारे, पोलादाचे कारखाने, कापडाच्या गिरण्या, इत्यादि. दारिद्र्यातून बाहेर पडू पाहणाऱ्या दुर्दैवी माणसाच्या वाट्याला मदत येतच नाही.

एका आफ्रिकन देशात परदेशी तंत्रज्ञांच्या साहाय्याने, परदेशी भांडवलाच्या मदतीने, आयात केलेल्या कच्च्या मालापासून प्लॅस्टिकच्या सँडल्स करण्याचा कारखाना उभारण्यात

आला. लाखो सँडल्स बनवायला आता फारच थोडे कामगार लागत होते. त्या देशात बनविलेल्या त्या सँडल्स असल्यामुळे, त्या 'स्वदेशी' होत्या, परंतु आयात केलेल्या सँडल्सपेक्षा त्या फारशा वेगळ्या नव्हत्या; कारण, उत्पादन-खर्चाच्या ८०% भाग परदेशात खर्च होत होता. परंतु त्यामुळे सँडल्स बनविणारे १०,००० स्थानिक कामगार बेकार बनले आणि त्या सँडल्सचा कच्चा माल पुरविणाऱ्यांवर आपत्ती कोसळली. परदेशी मदत घेणाऱ्या प्रत्येक विकसित देशात असेच घडत आहे; परदेशी मदतीमुळे हलाखी वाढत आहे.

परदेशी मदत उपयुक्त कशी करता येईल? वर्किंग ग्रुप ऑन इंटरमिजिएट टेक्नालॉजी ह्या एका खासगी संघटनेच्या मताप्रमाणे, लोक जे काय करत असतील ते नीट पाहून, ते अधिक चांगले कसे करता येईल हे त्यांना दाखविणे, हाच त्यांना मदत करण्याचा खरा मार्ग आहे. ह्याचाच अर्थ, बैलगाडीपासून जेट एंजिनपर्यंत उडी मारण्याचा अचाट कार्यक्रम आखण्याऐवजी तांत्रिक दृष्ट्या पुढची पायरी गाठण्यासाठी ज्ञान आणि आर्थिक मदत देऊ करणे, असा आहे.

ह्या प्रगतीत सर्वांना सहभागी होता येते; उपलब्ध कामगारांना काम मिळते आणि शिक्षणाच्या वाढीचा आर्थिक वाढ हा एक भाग बनतो. सामाजिक घडी निर्दयपणे विस्कटली जात नाही; उलट, ती घडी कायम राखून तिला काळजीपूर्वक आणि हळूहळू नवा आकार दिला जातो.

स्वतःचे संरक्षण करू न शकणाऱ्या, बेकार राहावे लागणाऱ्या, माणुसकीला कलंक लागेल इतक्या दारिद्र्यात पिचलेल्या लोकांचे-बद्दल दयाबुद्धी असेल आणि दुसऱ्यावर अन्याय न करणारी, हळूहळू वाढवीत नेलेली, लोकांच्या आवाक्यातील म्हणजेच लोकशाही पद्धतीची साधने निवडण्याचे तारतम्य असेल, तरच परदेशी मदत खऱ्या अर्थाने फलदायी होईल.

## आठवड्याला सरासरी दोन ब्रिटिश व्यापारी शिष्टमंडळांचे परदेशी गमन

ब्रिटनच्या राष्ट्रीय निर्यात मंडळाने गेल्या १२ महिन्यांच्या काळात साधारणपणे आठवड्याला दोन याप्रमाणे व्यापारी शिष्टमंडळे बाहेरदेशी पाठविली, असे मंडळाचे अध्यक्ष सर विल्यम मॅकफॅडझीन यांनी लण्डनमध्ये सांगितले. निर्यातदारांना मदत करण्याच्या बोर्ड ऑफ ट्रेडच्या योजनेनुसार पहिल्या वर्षी एकूण ११० शिष्टमंडळांच्या कार्यक्रमांची योजना केली. व्यापारी शिष्टमंडळ योजनेच्या पहिल्या वर्धापनदिनी ते बोलत होते. ते म्हणाले, "एकूण १८०० व्यावसायिकांना या वर्षात साहाय्य करण्यात आले. योजनेवर एकूण १,५०,००० पौंड (२० लक्ष रु.) खर्च झाले."

## सावकाराचा देणेकरी बनला

भारत स्वतंत्र झाला त्या वेळी, १९४६ मध्ये, भारताची ग्रेटब्रिटनमध्ये साठलेली शिल्लक ६० कोटी पौंड होती; ती आता संपत आली आहे, इतकेच नव्हे तर भारताला परदेशांचे १५७ कोटी पौंडांचे देणे झाले आहे. इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाला यावयाच्या ५·३ कोटी पौंडांचा आणि पी. एल. ४८० अन्वये यावयाच्या ९५कोटी पौंडांचा समावेश त्यात नाही. सावकाराच्या देणेकऱ्यांत एवढ्या मोठ्या प्रमाणावर शांततेच्या काळात घडलेले दुसरे एकही उदाहरण नाही. ह्या आकड्यांवरून दिसून येणारा भांडवलाचा सर्व प्रवाह योग्य कारणी लागला असे म्हणता येणार नाही. दर माणशी उत्पन्नातील अत्यंत सूक्ष्म वाढ, हे त्याचेच निदर्शक आहे.

## मदत देणाऱ्या देशांनी स्वीकारावयाचा वास्तव दृष्टीकोण

भारताच्या आर्थिक अडचणींपासून मदत देणाऱ्या देशांना बरेच शिकता येण्याजोगे आहे. भारताला दिलेली मदत फलदायी होऊ शकते, ही पहिली गोष्ट. दुसरी गोष्ट म्हणजे आर्थिक मदतीबरोबर तांत्रिक सल्लाही उपलब्ध करून दिला पाहिजे. दुर्गापूरच्या पोलाद कारखान्यासाठी ब्रिटिश आयर्न अँड स्टील फेडरेशन ब्रिटिश तंत्रज्ञ पाठवू शकले नाही; भिलईच्या कारखान्यासाठी राशियन तंत्रज्ञ नेहमी हजर होते.

भारतात ग्रेट ब्रिटनचे इतके भांडवल गुंतलेले आहे, की ते कायम राखण्यासाठी तरी भारताला आणखी मदत देणे भाग आहे. एका टोकाला अत्यंत दारिद्र्य आणि दुसऱ्या टोकाला प्रचंड औद्योगीकरण अशा परिस्थितीतही भारत हा आशियातील लोकशाहीचा एकमेव प्रतिनिधी आहे. ग्रेट ब्रिटनचे हिंदी प्रायव्हेट सेक्टरमध्ये ४० कोटी पौंड गुंतलेले आहेत. नवीन मदत बंद केली, तर ह्या गुंतवणुकीवरील डिव्हिडंडवर, विशेषतः ते ग्रेटब्रिटनकडे पाठविण्यावर, प्रतिकूल परिणाम झाल्याविना राहणार नाही.

सरकार ते सरकार, अशा स्वरूपात दिलेल्या मदतीकडे परतफेड आणि व्याज ह्या दृष्टीने न पाहता, मानवतेसाठी दिलेली मदत ह्याच दृष्टीने पाहायला हवे. "मदतीपेक्षा व्यापार श्रेयस्कर आहे." हे सूत्र मदत देणारांनी विसरता कामा नये; भारत ज्या जिनसा स्पर्धा करून निर्गत करू शकतो, त्यांचेवर प्रतिबंधक अटी व कर लादण्याची चूक करू नये.

भारताला नुकतेच जे आघात सहन करावे लागले आहेत, त्यामुळे त्यांतील नियोजकांना परिस्थितीची वास्तव जाणीव झालेली आहे. गेली १५ वर्षे मदत देत असलेल्या श्रीमंत देशांनीही अशीच वास्तवता दाखविली पाहिजे आणि कालांतराने भारत स्वतःच्या प्रेरणेने बलवान होऊ लागेल अशी परिस्थिती निर्माण होण्यास मदत केली पाहिजे.

## पश्चिम आफ्रिकेत भांडवलाला वाव

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्री ह्या संघटनेतर्फे पश्चिम आफ्रिकेतील देशांचा दौरा करण्यासाठी ७ जणांचे एक मंडळ पाठविण्यात आले होते. मंडळाने आपल्या दौऱ्यात नायजेरिआ, आयव्हरी कोस्ट, सिएरा लिऑन, गिनी आणि सेनेगल ह्या देशांचा प्रवास करून तेथील आर्थिक जीवनाची पाहणी केली. मंडळाच्या मताने ह्या देशांत संयुक्त-मालकीच्या व्यापारी कंपन्या काढण्यास आणि व्यापाराची वृद्धी करण्यास चांगला वाव आहे. ह्या देशांतील बाजारपेठा अद्याप फारशा भरभराटलेल्या नसल्याने तेथे छोट्या उद्योगधंद्यांत तयार होणाऱ्या मालालाच विशेष मागणी आहे. अशा उद्योगधंद्यांत प्रगत देशांना भांडवल गुंतविण्याची इच्छा नसल्याने भारताच्या भांडवलाला तेथे चांगली संधी उपलब्ध आहे.

## हातमागाच्या कापडाला बंदी

चालू वर्षाच्या जुलै महिन्यापासून सीलोनच्या सरकारने हातमागाच्या कापडावर बंदी घालण्याचे ठरविले आहे. सीलोनमध्ये हातमागाच्या कापडाच्या उत्पादनाला अधिक वाव मिळावा म्हणून हे धोरण स्वीकारण्यात आले आहे. देशाची सर्व गरज देशातल्या हातमाग विणकरांकडूनच भागविण्याचा सरकारचा इरादा आहे. सीलोनमध्ये हातमागाच्या कापडाची ६,००० केंद्रे उघडण्याचा सरकारचा मानस आहे. केंद्रातून दरसाल २·५ कोटी वार कापड तयार होईल असा अंदाज करण्यात आला आहे. सुमारे २५ हजार विणकर मुलींना ह्या धोरणामुळे रोजगार मिळेल अशी अपेक्षा आहे.

## कै. नरहर परशुराम ऊर्फ बाबुराव केळकर यांना सादर श्रद्धांजली.

[ ले.:—नी. ना. क्षीरसागर, रि. मॅनेजिंग डायरेक्टर दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि., इंडस्ट्रीज कन्सल्टंट, पुणे. ]

पुणे येथील भारतीय कारखानदारांचे सुप्रसिद्ध प्रतिनिधी व वितरक "केळकर बंधू" या वितरण-संस्थेचे एक संचालक श्री. बाबुराव केळकर हे सोमवार दि. ३१-१-१९६६ रोजी परलोकवासी झाले, याबद्दल आपणा सर्वांना दुःख होत आहे. कै. केळकर यांच्या जीवनाचा स्थूल मानाने आढावा घेतल्यास 'लहान' व्यक्तीसुद्धा आपल्या अंगी असलेल्या ध्येयवादामुळे, सतत चिकाटीने, व्यापारातील सचोटीने, त्या त्या काळात लहान दिसणारी कार्ये मोठ्या पसाऱ्यात वाढवू शकतात व सेवा-धर्माने राष्ट्रहित-देशहित कसे साधतात, याचे अनेक प्रसंग कै. बाबुराव केळकर यांच्या सान्निध्यात ४० वर्षांहून अधिक काळाचा त्यांचा व माझा सहवास व स्नेह असल्याने ते "प्रसंग व गुण" आपले वाचकवर्गास मोलाचे वाटतील या दृष्टीने खाली देत आहे.

### १. स्वदेशीची सेवा

ब्रिटिशांच्या अमदानीत देशातील कारखानदारी, विशेषतः महाराष्ट्रातील कारखानदारी, ही काही बोटांवर मोजण्याइतक्याच कारखानदारांच्या हातात होती. हे सुमारे ४० वर्षांपूर्वीचे कारखाने आज ज्या समृद्ध व विस्ताराने उत्पादन करीत आहेत, तेच त्या काळात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत तग धरून होते. देशी कारखान्यांचा माल लोकांनी घ्यावा म्हणून स्वदेशी चळवळ, प्रदर्शने, प्रचार, अशा साधनांनी देशी कारखानदारांचा माल खपवावा लागत असे! कै. बाबूराव यांनी टिळक महाविद्यापीठाच्या 'व्यापारविशारद' पदव्युत्तर पुणे येथील नू. म. विद्यालयातील 'स्वदेशी भांडारात' हे व्रत प्रा. नारळीकर यांच्या प्रेरणेने घेतले व पुणे येथे "केळकर बंधू" देशी कारखानदारांचे प्रतिनिधी म्हणून काम करू लागले. मुख्यतः महाराष्ट्रातील किर्लोस्कर, ओगले, शिवाजी मेटल वर्क्स, वगैरेंचे ते प्रमुख विक्रेते बनले व आज त्यांच्याकडे सुमारे ५० चे वर देशी कारखानदारांच्या एजन्सीज आहेत. देशी मालाचा सातत्याने प्रचार व प्रसार सर्व हयातभर कै. बाबूराव यांनी केला व देशी उद्योगधंद्यांना बाजारपेठ शहरी व ग्रामीण भागांत निर्माण करण्यास हातभार लावला.

### २. "व्यापारी महाराष्ट्र" प्रचाराचे साधन

डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कामर्स, पुणे या संस्थेचे आद्य गुरुवर्य, श्री. नानासाहेब भोपटकर यांनी हे "व्यापारी महाराष्ट्र" पुण्यांत व्यापारी उलाढालींचे खास वर्तमानपत्र म्हणून सुमारे ४५ वर्षांपूर्वी सुरू केले. तो काळ व्यापार-उदीम-कारखानदारी याला अत्यंत प्रतिकूल असा होता. सर्वांचे सरकारी नोकरी हेच शैक्षणिक ध्येय अशी समाजात समजूत प्रसृत झालेली होती! गु. नानासाहेब यांना हे वर्तमानपत्र आर्थिक अडचणीने पुढे बंद करावे लागले. पुण्यातील कै. हरिभाऊ घारे, वाङ्मयविशारद व कै. बाबुराव केळकर व्यापारविशारद, मराठी नव्यांचे एक कारखानदार व दुसर स्वदेशीचे कडे पुरस्कर्ते अशा या दोन तरुणांनी केवळ ध्येयपूर्तीसाठी हे "व्यापारी महाराष्ट्र" चालू केले व सर्व आर्थिक जबाबदारी अंगावर घेऊन चालविले. ते आज कारखानदारांचे व "केळकर बंधू" चे मुखपत्र म्हणून चालू आहे. स्वदेशी प्रचारास या वर्तमानपत्राचा प्रामुख्याने उपयोग कै. बाबूराव यांनी पदरमोड करून आपले एक 'व्यसन म्हणून' केला.

### ३. भारत इंडस्ट्रिअल बँकेचे नाव

१९३५ ते १९३८ या चार-पाच वर्षांचे कालात पुणे शहरात "व्यापार उद्योग" यांना भांडवलपुरवठा करण्याच्या दृष्टीने बँक ऑफ महाराष्ट्र, प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल व भारत इंडस्ट्रिअल या तीन बँकांच्या संस्थापनेशी प्रस्तुत लेखकाचा दृढ संबंध होता. भारत इंडस्ट्रिअल बँक संस्थापनेचे एक 'प्रमोटर सिंडिकेट' म्हणून आमचे बाबूराव कै. केळकर हे एक होते. कंपनी कायद्यात १९३४–३५ मध्ये नुकताच बदल होऊन बँकिंग कंपन्यांबाबत बरीच नवीन कलमे अमलात आली होती. त्या कामी 'रजिस्ट्रेशन' होण्यास बराच खटाटोप करावा लागला.

बँकेच्या नावाबद्दलही रजिस्ट्रेशनचे कामी काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. त्या सोडविण्यासाठी आम्ही काही मंडळी मुंबईस गेलो व 'एम्पायर हॉटेल' मध्ये उतरलो. आमचे हितचिंतक कै. बाबूरावही आमचेबरोबर होते. रजिस्ट्रेशनचे कामी नावातली अडचण सोडविण्याचा सुलभ मार्ग म्हणजे थोडा तांत्रिक बदल हा होता! यावर आमच्या मंडळीत दोन मते पडली. एक ध्येयपूर्तीसाठी 'औद्योगिक' शब्द ठेवावा म्हणणारा पक्ष व 'औद्योगिक' शब्दाऐवजी 'कमर्शिअल' असा बदल करून रजिस्ट्रेशन करून घेणे हा दुसरा पक्ष. आम्हात एकमत दिवसभर चर्चा होऊनही होईना व अखेर पुण्यास येऊन प्रमोटिंग डायरेक्टर्सची सभा घेऊन हा निर्णय घ्यावयाचा असे ठरले! दुसरे दिवशी सकाळी कै. बाबूराव केळकर यांनी एक तोड सुचविली की, पुण्यास जाऊन विलंब लावण्यापेक्षा तुम्हास नावाचा निर्णय मी सुचवितो, तो पसंत आहे का? आपण दोन्ही पक्षांचे दृष्टीने निर्णय मान्य करण्यास नाणे उडवूं या व जो जिंकेल ते नाव निश्चित करून बँकेचे रजिस्ट्रेशनचे कागद दाखल करावेत. 'रुपाया' उडविण्याची कल्पना उभयपक्षी मान्य झाली व हे रुपाया उडविण्याचे काम कै. बाबूराव यांचेकडे दिले. 'टॉस' जिंकतात तसा निर्णय 'भारत इंडस्ट्रिअल' या नावाचा निर्णय प्रस्तुत लेखकाच्या बाजूने झाला व 'भारत इंडस्ट्रिअल बँक लि.' चे रजिस्ट्रेशन दि. १४-४-१९३८ रोजी झाले.

### ४. किर्लोस्कर–पुणें शहराचे वैभव...

किर्लोस्कर ऑईल इंजिन्सचा कारखाना पुण्यास आणण्याची योजना होऊन पुण्याचे आसपास जागा पाहण्याचे काम चालू होते. सुमारे १९४० सालचा सुमार असेल. या कामासाठी श्री. शंतनुराव पुण्यास आले असता 'केळकर बंधू' यांचे बुधवारातील पॅरामाऊंट टॉकीजजवळील दुकानात सायंकाळी ५॥–६ चे सुमारास बसले होते. ते प्रस्तुत लेखकाला विचारमग्न व सचिंत असे दिसले. त्यावर मी श्री. शंतनुराव यांना सहज म्हणालो, "शंतनुराव, आज असे विचारमग्न का दिसता?" त्यावर शंतनुराव विनोदाने म्हणाले, "हे पाहा क्षीरसागर, आम्ही पुण्यास यावे असे तुम्हास वाटत नाही असे दिसते." त्यावर मी उत्तरलो, "शंतनुराव असे कसे म्हणता? अहो, 'किर्लोस्कर' पुण्यात आले तर आमच्या पुण्याच्या वैभवात भरच पडेल." असा विनोदाने संवाद चालला असता दापोडी येथील जागेचा विषय व अडचणी थोडक्यात सांगितल्या. योगायोग असा की, त्या अडचणी सोडविण्याचे कामी कै. बाबूराव केळकर, कै. राजाभाऊ केळकर व प्रस्तुत लेखक यांच्या मध्यस्थीचा थोडासा उपयोग होऊन किर्लोस्करांना हवी असलेली

दापोडी येथील हल्लीच्या कारखान्याची जागा मिळाली. किर्लो-स्करांचा ऑइल इंजिन्सचा कारखाना, त्यानंतर स्वस्तिक रबर, वगैरे अनेक कारखाने त्या भागात निघून पुणे शहर हे आता औद्योगिक केंद्र झाले आहे.

**५. चलनफुगवटा कमी करण्याची योजना**

कै. बाबूराव केळकर यांच्या विचाराची झेप व दुर्दम्य आशावाद ह्या सर्वसाधारण मनुष्याच्या वृत्तीला न झेपणारा असा असे. एखादी गोष्ट त्यांच्या मनाने घेतली की ते त्या गोष्टीचा पाठपुरावा सातत्याने करीत राहात व ध्येयपूर्तीसाठी कष्ट घेत. भारत सरकारच्या अर्थमंत्रीपदावर श्री. चिंतामणराव देशमुख यांची योजना झाली होती. काळाबाजार पैसा बाहेर येणाच्या दृष्टीने कोणतेही मोठाले व्यवहार रोखीने न करता बँकांमार्फत चेकनेच करावेत व तेही रोख रक्कम न देता 'वर्ग करून' ट्रॅन्स्फर एन्ट्रिजने बँकांनी करावेत; सर्वसाधारण व्यापारी व कारखानदाराने सुद्धा आपले व्यवहारातील देणी-घेणी चेकनेच करावीत अशा दृष्टीने एक योजना कै. बाबुराव यांनी केली. त्या योजनेची चर्चा व्यापारी, कारखानदार, बँकर्स यांच्याशी करण्यासाठी योजनेच्या सायक्लोस्टाईल प्रती करून चर्चेस येण्यापूर्वी ते पाठवीत असत. सरकारने ही योजना अमलात आणण्यास जर कायदेकानूतही बदल करावा लागला तर तोही मध्यवर्ती सरकारने करावा अशी सूचना होती.

ही योजना अर्थमंत्री श्री. देशमुख यांनाही त्यांनी पाठविली व चर्चेसाठी दिवस व वेळ कै. बाबूराव यांनी पत्राने मागितला. श्री. देशमुख यांनी त्यांचे पुण्याचे मुक्कामात दिवस व वेळ दिल्याचेही प्रस्तुत लेखकास माहीत आहे. त्या योजनेचा त्यांच्या अपेक्षेप्रमाणे उपयोग झाला असता किंवा नाही याचा अंदाज जरी नसला तरी 'काळाबाजार' करणारे लोक रोखीचाच अवलंब करतात. यावरून चेकने व्यवहाराचे कायदेशीर बंधन आलेच असते तर हे व्यवहार थांबण्यास काही अंशी मदत झाली असती असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

कै. बाबूराव यांच्यासारख्या सालस, दीर्घोद्योगी व महत्त्वाकांक्षी मित्र आपणातून कायमचा गेला! त्यांच्या स्मृतीस ही श्रद्धांजली वाहून त्यांचे आत्म्यास परमेश्वराने अखंड शांती द्यावी ही प्रार्थना करून लेख पुरा करतो.

---

**४ थ्या पंचवार्षिक योजनेतील रस्तेबांधणी**

चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या कालात रस्तेबांधणीचा एक मोठा कार्यक्रम मध्यवर्ती सरकार हाती घेणार आहे. तो पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय हमरस्त्याचे नवीन जाळेच तयार होईल. कार्यक्रमासाठी ४०० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. देशातील प्रमुख शहरे, नवीन औद्योगिक विभाग आणि ग्रामीण भागातील बाजारपेठा ही सर्व नव्या संकल्पित रस्त्यांनी एकमेकांशी जोडली जातील. ह्या कार्यक्रमात राज्य सरकारेही भाग घेणार असून ३७० कोटी रुपये खर्च करणार आहेत. प्रत्येक खेडे पक्क्या रस्त्यापासून ४ मैलांच्या आत आणण्याचे उद्दिष्ट कार्यक्रमात ठेवण्यात आले आहे. मध्यवर्ती सरकार मुख्य रस्त्यांना जोडणारे ३४० मैलांचे जोडरस्ते बांधणार असून ५० मोठे पूलही बांधणार आहे. राज्य सरकारांना मध्यवर्ती सरकारकडून १०० कोटी रुपयांपर्यंत मदत मिळणार आहे.

---

**दिल्लीजवळ अणुशक्तीच्या वीजकेंद्राची शिफारस**

नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च ह्या संघटनेने दिल्लीजवळ एका नव्या अणुशक्तीच्या वीजकेंद्राची उभारणी करण्याची शिफारस केली आहे. ह्या संघटनेने पंजाब, राजस्थान, काश्मीर, दिल्ली आणि हिमाचल प्रदेश ह्या भागांना १९७५ पर्यंत लागणाऱ्या वाढत्या वीजपुरवठ्याची पाहणी केली आहे. विजेच्या पुरवठ्याची वाढत जाणारी मागणी पुरी करण्यासाठीच दिल्लीजवळ आणखी एक अणुजनित वीज केंद्र उभारण्याची आवश्यकता आहे. ह्या भागातील दरडोई विजेच्या वापराचे प्रमाण दक्षिणेतील दरडोई विजेच्या वापराच्या दुप्पट असले, तरी भारताचा पूर्व भाग आणि पश्चिम भाग ह्यांमधील दरडोई वापराच्या मानाने कमी आहे. ह्या सर्व भागातील विजेच्या वाढत्या मागणीची पाहणी संघटनेने नुकतीच पूर्ण केली आहे, आणि वाढती गरज लक्षात घेऊन राजस्थानमध्ये उभारण्यात येणाऱ्या अणुशक्तीच्या वीजकेंद्राची उत्पादनक्षमता दुप्पट करावी अशीही शिफारस केली आहे. त्याचप्रमाणे जम्मू व काश्मीर राज्यांतील पाण्याच्या प्रवाहावर वीज उत्पन्न करू शकणाऱ्या सर्व ठिकाणांचा अधिकात अधिक फायदा करून घ्यावा असे संघटनेने सुचविले आहे. जम्मू आणि काश्मीर राज्यात लिग्नाइट ह्या प्रकारचा हलक्या दर्जाचा कोळसा मोठ्या प्रमाणावर सापडलेला आहे. त्याचा साठा सुमारे १० कोटी टन असावा असा अंदाज आहे. अशाच प्रकारच्या कोळशाचा काही साठा राजस्थानातही आहे. ह्या कोळसाखाणींचा विकास करण्यात आला तर उत्तर भागात लांबवरून आणण्यात येणाऱ्या कोळशात बचत होईल असे संघटनेचे मत आहे.

---

**भारतामधील दुष्काळाबाबत फ्रान्समध्ये विचारणा**

फ्रान्स आणि युरोपातील इतर देशांतून हिंदमधील दुष्काळी परिस्थितीकडे लक्ष देण्यात येऊ लागले आहे. तेथील आंतर-राष्ट्रीय दुष्काळविरोधक संघटनेने भारतासाठी मदत मिळ-विण्याचे प्रयत्न चालू केले आहेत. पॅरिसमधील हिंदी वकिलाती-कडे लोक आपण होऊन देणग्याही पाठवीत असून, अशा देणग्यांची संख्या अलीकडे वाढू लागली आहे. खुद्द फ्रेंच सरकारने दुष्काळाबाबत काही अधिकृत प्रचार केलेला नाही; तरीही लोक हिंदविषयी सहानुभूती दाखवीत आहेत. काही फ्रेंच नागरिक, दुष्काळामुळे निराधार झालेली हिंदी मुले बाळग-ण्याच्या शक्यतेविषयी विचारणा करीत आहेत. एका प्रसिद्ध गायकाने दर आठवड्यात आपले एका दिवसाचे उत्पन्न दुष्काळ निवारण्यासाठी देण्याची तयारी दाखविली आहे. फ्रेंच सरकार १ कोटी फ्रँक औषधासाठी व दुधाच्या भुकटीसाठी देण्यास तयार आहे.

---

**सौंदर्याच्या व्यापाराला राजकारणाची झळ**

अमेरिकेतील काही चटकचांदण्या सौंदर्यवृद्धीसाठी चीन-कडून आयात करण्यात आलेल्या कृत्रिम भुवया वापरीत असाव्या अशी शंका अमेरिकेच्या अर्थखात्याला आली आहे. ह्या व्यापारा-विरुद्ध उपाययोजना करण्याचे खात्याने ठरविले आहे. कारण, चीनशी कोणत्याही प्रकारचा व्यापार करण्यास अमेरिकेच्या सरकारने बंदी केली आहे. ब्रिटन, फ्रान्स, बेल्जम, जर्मनी, इटाली इत्यादी देशांकडून केसांचे टोप, टोप्या, भुवया, इत्यादी माल अमेरिकेत आयात करण्यात येतो. आता हा माल अमेरिकेचे कॅस्टम्स खाते अडवून धरणार असून, तो चिनी स्त्रियांच्या केसां-पासून बनविलेला नाही अशी खात्री झाल्यावरच मुक्त करण्यात येणार आहे.

हिंदुस्थान मिल कामगारांची

## स्वर्गस्थ सौ. पन्ना ठाकरसींना श्रद्धांजली

हिंदुस्थान मिलमध्ये चालू असलेल्या कुटुंबनियोजन व आरोग्य-केंद्राचा लाभ शेकडो कामगार कुटुंबे घेत आहेत. या केंद्राच्या स्थापनेसाठी व त्याच्या प्रगतीसाठी ज्यांनी खूप प्रयत्न केले त्यांत श्री. कृष्णराज ठाकरसी यांच्या सुशील पत्नी स्व. सौ. पन्ना-भाभींचा फार मोठा वाटा होता. त्यांच्या कामगारप्रेमाचे प्रतीक म्हणून त्यांच्याच हस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले होते. पण दुर्दैव असे, की पन्नाभाभींच्या प्रेमाचा लाभ कामगारांना फार काळ लाभला नाही. त्या अकस्मात दि. ६-२-६५ रोजी सर्वांना दुःखसागरात लोटून देवाघरी निघून गेल्या आणि त्यांच्या कुटुंबीयां-प्रमाणेच शेकडो कामगारांनाही आपल्या घरचेच जिव्हाळ्याचे माणूस गेल्याचे दुःख झाले.

त्या स्वर्गवासी झाल्यास एक वर्ष झाले. त्या निमित्ताने गिरणी-तील कामगारांनी स्वर्गस्थ पन्नाभाभींना श्रद्धांजली अर्पण करण्याचा खास कार्यक्रम गिरणीच्या आवारात दि. १७।२।६६रोजी दुपारी ३-१०वा. घडवून आणला.सदर कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन काम-गारांनीच केले होते. श्रद्धांजली व पुण्यस्मृतीनिदर्शक समयोचित मजकुराचे फलक लिहिले होते. स्व. सौ. पन्नाभाभींची रांगोळीने काढलेली भव्य तसबीर उच्चस्थानी ठेवली होती. मंद समया तेवत होत्या. उदबत्त्यांच्या मधुर वासाने वातावरण पवित्र व प्रसन्न झाले होते. ३-१० वाजेपर्यंत सुमारे ५०० कामगार जमले होते.

कामगार प्रतिनिधी श्री. पांडुरंग रेवाळे यांनी आपल्या प्रास्ता-विक भाषणाने कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट केला आणि स्व. पन्ना-भाभींच्या स्मृतीस अभिवादन करून तसबिरीस भव्य पुष्पहार घातला. त्यानंतर विव्हिंग जॉबर श्री. हिरालाल रामप्रयाग यांनी स्व. पन्नाभाभींच्या कार्याचा परिचय करून देताना, धनाढ्य कुटुंबात जन्मास येऊनही गोरगरिबांसाठी तळमळणारी एक महान व्यक्ती या शब्दाने त्यांचा गौरव केला. आमचे कुटुंबनियोजन व आरोग्यकेंद्र हे स्व. पन्नाभाभींचे स्मृतिचिन्हच होय असे त्यांनी सांगितले. नंतर दोन मिनिटे सर्वांनी स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली. नंतर शांतिस्तवन म्हटले गेले आणि कार्यक्रम संपला.

### जिव्हाळ्याच्या प्रश्नांची चर्चा करा

पुणे पत्रकार संघाचा रौप्यमहोत्सव गुरुवार दि. २४ फेब्रुवारी रोजी साजरा झाला. त्या वेळी 'फिनॅन्शियल एक्सप्रेस'चे संपादक श्री. ग. मं. लाड हे मुख्य पाहुणे होते. त्यांनी आपल्या भाषणात आपल्या इकडील वृत्तपत्रांतून राजकीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांना अवास्तव महत्त्व दिले जाते आणि जिव्हाळ्याच्या आर्थिक प्रश्नांकडे दुर्लक्ष होते, अशी तक्रार केली. दुष्काळ निवारण, धान्योत्पादन, लोकसंख्येचा प्रश्न, इत्यादी प्रश्नांपेक्षा जागतिक घडामोडींचीच उठाठेव केली जाते. रशियातील वृत्तपत्रांतून आणि रेडिओवरून उत्पादनाच्या बातम्यांना प्राधान्य दिले जाते, हे सुप्रसिद्धच आहे. 'प्रावदा' शिष्टमंडळाचे नेते मि. इगॉर बेलिएव्ह ह्यांनी त्रिवेंद्रम येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले, की सोव्हिएट रिपब्लिकचे मुख्य पत्र 'प्रावदा' ह्याचा खप ८३ लक्ष प्रती एवढा आहे; आणि त्यात शेतीविषयक बातम्यांना विशेष महत्त्व दिले जाते.

### हंगेरीत शास्त्री तिकीट

हंगेरीच्या टपाल खात्याने श्री. लाल बहादुर शास्त्री ह्यांच्या स्मृत्यर्थ एक खास तिकीट काढले आहे.

### संरक्षणावरील खर्चाचा ब्रिटनलाही भार

चीन आणि पाकिस्तान ह्या शेजारी राष्ट्रांच्या आक्रमक कार-वायांना तोंड देण्यासाठी भारताला संरक्षणावरील खर्चात खूप वाढ करावी लागली आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक अडचणीत आणखीच भर पडली आहे. तथापि, संरक्षणावरील खर्च न पर-वडण्याचे आणि तरीही करावा लागण्याचे दुखणे फक्त भारता-पुरतेच मर्यादित नाही. रशियासारख्या मोठ्या आणि बलाढ्य देशालाही संरक्षणविषयक खर्चामुळे लोकांचे राहणीचे मान वाढविण्यात जलद यश येणे दुरापास्त झालेले आहे. ब्रिटनही ह्या आपत्तीमधून सुटलेले नाही. ब्रिटनने आपल्या संरक्षणविषयक धोरणासंबंधी एक श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली आहे. त्यात ब्रिटनला संरक्षणविषयक योजनांवर दरसाल २०० कोटी पौंडांपेक्षा अधिक खर्च करता येणार नाही असे नमूद करण्यात आले आहे. संरक्षणावरील खर्चाला मर्यादा घालण्याची कल्पना उगम पावल्यावर त्यातूनच आणखी मतभेदांना प्रारंभ झाला आणि ब्रिटनच्या आरमारमंत्र्याने आपला राजीनामा दिला. ब्रिटन हे राष्ट्र दर्यावर्दी म्हणून प्रसिद्ध आहे. एका काळी जगभर पसर-लेल्या साम्राज्याचे रक्षण करण्यासाठी प्रभावी नौदलाची गरज होती. नौदलात विमानवाहू बोटीही अर्थात आल्याच. पण त्या बांधण्यासाठी अवाढव्य खर्च येतो, म्हणून त्या न बांधता विमानदलच अधिक सुसज्ज करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. अलीकडेच ब्रिटनने अमेरिकेकडून अद्ययावत पद्धतीची लढाऊ विमाने घेण्याचा निर्णय घेतला आहे, तो ह्याच धोरणाचा निदर्शक आहे. उलट, आरमारमंत्र्यांच्या म्हणण्याप्रमाणे विमान-वाहू बोटी आणि विमाने ह्या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक असल्याने त्यांची फारकत करता येत नाही. ब्रिटनचे साम्राज्य अस्ताला गेल्यावर त्याचे संरक्षणविषयक धोरणही संरक्षणातील तांत्रिक प्रगतिमुळे बदलत आहे.

### नायगारोचा प्रवाह बदलण्याची योजना

अमेरिकेतील नायगाराचा धबधबा हा जगातील हौशी प्रवाशांचे एक मोठे आकर्षण आहे. ह्या धबधब्याचे अमेरिकेच्या प्रदेशात पडणारे पाणी वळविण्याची एक योजना लष्करी एंजिनिअर्सनी तयार केली आहे. अमेरिकेच्या प्रदेशात हा धबधबा सुमारे १,०५० फूट रुंदीचा असून पाण्याच्या सतत प्रवाहाने त्याच्या तळाचा भाग फुटलेल्या खडकाच्या दगडांनी भरून जाऊ लागला आहे. काही ठिकाणी तर धबधब्याची १९३ फूट उंचीची उडी निम्म्याने कमी झाली आहे. दगडगोट्यांची ही प्रचंड रास बाजूला करून धबधबा कायम राखणे आवश्यक आहे. तसे न केल्यास एखाद्या पिढीतच धबधब्याचे स्वरूप पालटून त्याचे रूपांतर झपाट्याने वाहणाऱ्या जलप्रवाहात होण्याची भीति आहे. धबधबा पाहण्यासाठी दरसाल सुमारे ५० लाख लोक येत असतात. धबधबा दर सेकंदाला ५० हजार गॅलन पाणी खाली फेकीत असतो.

### ऱ्होडेशियातील युरोपियनांत सायकलींचा खप

ऱ्होडेशियाच्या आर्थिक नाकेबंदीमुळे पेट्रोलचा तुटवडा पडला आहे, त्यामुळे सायकलींचा खप वाढला आहे. फक्त युरोपियनांनाच सायकली विकण्यात आल्या. अजूनही साल्सबरीत सायकलीवर युरोपियन पुरुष किंवा स्त्री क्वचितच दिसते.

## मध्यवर्ती सरकारचे अंदाजपत्रक

### महसूल व खर्चाच्या प्रमुख बाबी

( नवीन करवाढीने उत्पन्नात भर ( + )

**महसूल :**

| खाते | १९६५–६६ अंदाजपत्रक | १९६५–६६ दुरुस्त अंदाजपत्रक | १९६६–६७ अंदाजपत्रक |
|---|---|---|---|
| आयात कर | ४९०·५० | ५३१·२० | ५६०·००<br>+०·५२ |
| केंद्रीय उत्पादन कर | ८१९·१९ | ८६१·३५ | ९६९·७०<br>+४२·२७ |
| कंपन्यांचे कर | ३७१·६० | ३३०·०० | ३४०·००<br>+३६·०७ |
| प्राप्तिकर | २९१·५० | २६०·०० | २७०·००<br>+२४·४५ |
| एस्टेट ड्यूटी | ७·४० | ७·०० | ७·४०<br>०·७० |
| संपत्तिकर | १३·५० | १४·०० | १४·०० |
| खर्चावर कर | १·५५ | ०·७५ | ०·७५<br>–०·६० |
| देणगी कर | ३·१० | ३·०० | ३·००<br>–१·७१ |
| इतर खाती | २३·८७ | २४·७६ | २६·४७<br>+०·५० |
| कर्जाचे व्याज वगैरे | २९६·९३ | ३१६·४६ | ३६०·६२ |
| कारभारविषयक बाबी | ९·५० | ९·३६ | ९·४५ |
| सामाजिक व विकासाच्या बाबी | २३·५७ | २४·१९ | २२·५६ |
| नदी धरण योजना | ०·१३ | ०·१२ | ०·१२ |
| सार्वजनिक बांधकाम | ३·९४ | ४·२२ | ४·१५ |
| दळणवळण | ६·७५ | ८·२० | ८·४५ |
| चलन–टांकसाळ | ६१·६९ | ६२·५५ | ६४·९४ |
| संकीर्ण | २५·४७ | २६·६९ | १९·०७ |
| वर्गणी–देणग्या वगैरे | ३४·८१ | ३५·०७ | ४३·३४ |
| विशेष बाबी | ६०·५० | ८०·७२ | ३०·६६ |
| प्राप्तिकरातील राज्यांचा वाटा | १२१·२७ | १२३·३४ | १३०·४५ |
| एस्टेट ड्यूटीतील राज्यांचा वाटा | ७·१७ | ६·१९ | ७·११<br>–०·६९ |
| **एकूण** | **२३४५·८७** | **२४६९·५१** | **२६२७·१२<br>+१०१·५१** |

**खर्च :**

| | | | |
|---|---|---|---|
| करवसुली खर्च | २८·८८ | २९·६४ | ३०·८४ |
| कर्जाचे व्याज | ३६५·११ | ३७२·६१ | ४१४·८३ |
| कारभार खर्च | ९१·३६ | ९२·२१ | ११०·०८ |
| सामाजिक व विकास बाबींचा खर्च | १८४·६६ | १७७·७३ | १९५·५७ |
| धरणयोजना | १·९८ | १·९० | २·०३ |
| सार्वजनिक बांधकाम | २२·९८ | २१·७७ | २३·८३ |
| दळणवळण | १०·६२ | १०·९४ | १०·९४ |
| चलन–टांकसाळ, | १६·४० | १७·०३ | १७·८२ |
| संकीर्ण | ११६·२७ | १२७·३६ | १५२·३५ |
| राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना ग्रँट | ३२७·११ | ३३४·९५ | ३९६·३० |
| उत्पादनकरातील राज्यांचा वाटा | १४०·८४ | १४५·९२ | २२१·७५ |
| इतर खर्च | ४·६९ | ४·८२ | ५·०२ |
| विशेष बाबी | ६५·८४ | ८१·७१ | ३७·३८ |
| संरक्षण खर्च | ७४८·७४ | ७६९·०६ | ७९७·६७ |
| **एकूण** | **२११६·४८** | **२१८७·४२** | **२४०७·४१** |

### किर्लोस्कर ऑइल एंजिन्सची जर्मन सबसिडिअरी

एफ. एच. शूल, जीएमबीएच हॅंबर्ग, पश्चिम जर्मनी, ह्या कंपनीचे ६२ लक्ष रुपयांचे ऑर्डिनरी भाग खरेदून त्या कंपनीला किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि. आपली दुय्यम कंपनी बनविणार आहे. त्यामुळे किर्लोस्कर कंपनीला त्या कंपनीच्या ज्ञानाचा व डिझाइन्सचा फायदा मिळून त्याप्रमाणे आपले उत्पादन वाढविता येऊन निर्गतही पुष्कळ वाढविता येईल. ही जर्मन कंपनी ७५ वर्षांची जुनी असून तिचे ७५% भांडवल आता किर्लोस्कर कंपनीच्या मालकीचे होईल. त्यामुळे किर्लोस्कर कंपनीचा युरोपियन कॉमन मार्केटमध्ये प्रवेश होईल. युरोपियन बाजारपेठ तिला सुलभतेने उपलब्ध होईल. जर्मन कंपनीच्या यंत्रांची निर्गत सध्या ७५ देशाकडे चालू आहे; ती आता किर्लोस्करांच्या नियंत्रणाखाली येईल. लॅटिन अमेरिका, अमेरिका आणि कॅनडा येथे मालखपविण्यास त्यामुळे सोपे जाईल.

---

### मुसोलिनीचा जतन करून ठेवलेला मेंदू

इटलीचा हुकुमशहा, बेनिटो मुसोलिनी, ह्याला २६ एप्रिल, १९४५ रोजी फाशी दिल्यानंतर त्याचा मेंदू वॉशिंग्टन येथील सेंट एलिझाबेथ सायकिॲट्रिक इस्पितळांत तपासण्यासाठी नेऊन तेथे तो जतन करण्यात आला. तो आपणास परत मिळावा, अशी त्याच्या पत्नीने अमेरिकन सरकारास विनंती केली आहे.

---

### हिंदी वानरांची निर्गत घटली

अमेरिका, ग्रेटब्रिटन, रशिया आणि युरोपांतील काही देश भारतातून वानरांची आयात करीत असतात. १९६४–६५ मध्ये भारताने २२·४१ लक्ष रुपयांच्या वानरांची निर्गत केली. १९६३–६४ मध्ये ३४·५५ लक्ष रुपयांच्या वानरांची निर्गत झाली होती.

---

### आजच्या भारताचे सचित्र वर्णन

प्रिन्सेस मार्गारेटचे पति, लॉर्ड स्नोडन, ह्यांना लंडन टाइम्सने 'आजचा भारत' हे सचित्र वर्णन तयार करण्यासाठी तीन आठवड्यांच्या दौऱ्यावर भारतात पाठविले होते. आपले काम संपवून हे चित्रकार गेल्या आठवड्यात लंडनला परत गेले. मि. डेव्हिड होल्डन हे चित्राखालील मजकूर लिहिणार आहेत, तेहि लॉर्ड स्नोडन ह्यांच्या समवेत आले होते.

---

### जुन्या कर्जाच्या नूतनीकरणाची विनंती

४ थ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भारताला ४,००० कोटी रुपयांची गरज लागेल. त्यांपैकी १,२०० कोटी रुपये जुन्या कर्जफेडीसाठी लागतील. जागतिक बँक, जपान, अमेरिका, ग्रेट ब्रिटन, प. जर्मनी आणि फ्रान्स ह्या आपल्या सावकारांना भारताने जुन्या कर्जांचे नूतनीकरण करण्याची विनंती केली आहे. परदेशी हुंडणावळीच्या टंचाईमुळे हा नामुष्कीचा प्रसंग आला आहे.

---

**रशिआ–अमेरिकेचा संयुक्त चित्रपट**—अमेरिकेतील वॉर्नर ब्रदर्स ह्या प्रसिद्ध चित्रपटनिर्मात्या कंपनीने रशियाच्या सहकार्याने एक बोलपट तयार करण्याची योजना आखली आहे. रशिआतील प्रसिद्ध संगीतनिर्माता चायकॉव्हस्की ह्यांच्या जीवनावर तो काढण्यात येणार असून, सर्व चित्रीकरण रशियांत करण्यात येणार आहे. चित्रपटातील कलावंत निरनिराळ्या देशांतील असतील आणि तो रंगीत असेल.

## रेल्वेचे १९६६–६७ चे अंदाजपत्रक

( आकडे कोटी रुपयांचे )

| | पक्के आकडे (१९६४–६५) | अर्थसंकल्प (१९६५–६६) | दुरुस्त अर्थसंकल्प (१९६५–६६) | अर्थसंकल्प (१९६६–६७) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| वाहतुकीचे एकूण उत्पन्न | ६६०·८५ | ७१६·०० | ७४१·८० | ७९५·३३ (अ) |
| चालू निव्वळ (वसूल व्हावयाच्या किंवा देणे असलेल्या रकमा विचारात घेऊन) | ४३३·४५ | ४५७·८४ | ४८२·०४ | ५०८·६८ |
| महसुलातून घसारा राखीव निधीत जमा | ८३·०० | ८५·०० | ८५·०० | १००·०० |
| सेवानिवृत्तिवेतन निधीत जमा | ११·५० | १२·०० | १२·०० | १३·५० |
| निव्वळ संकीर्ण खर्च (महसूल खाती खर्च टाकलेल्या बांधकामाचा खर्च धरून) | १४·७९ | १६·०२ | १६·५२ | १७·४७ |
| एकूण | ५४२·७४ | ५७०·८६ | ५९५·५६ | ६३९·६५ |
| निव्वळ रेल्वे महसूल | ११८·११ | १४५·१४ | १४६·२४ | १५५·६८ |
| सर्वसाधारण महसुलांत जमा (ब) रेल्वेत गुंतविलेल्या भांडवलावरील लाभांश | ९२·४३ | १०३·४० | १०३·७५ | |
| उतारू भाडे करापोटी राज्यांना द्यावयाची रक्कम | १२·५० | १२·५० | १२·५० | १३३·४९ |
| निव्वळ शिल्लक | १३·१८ | २९·२४ | २९·९९ | २२·१९ |

(अ) मालवाहतुकीच्या दरांत सुचविलेल्या फेरफारामुळे १८·१० कोटी रु. ची वाढ महसुलात होणार आहे. त्याचा समावेश वरील आकड्यात करण्यात आला आहे.

(ब) सन १९६६–६७ मधील सर्वसाधारण महसुली उत्पन्नावरील लाभांश १९६५ प्रमाणेच आणि १९६३–६४ पर्यंतच्या लाभांश-भांडवल गुंतवणुकीवर ५·५ टक्के दराने आणि त्यानंतरच्या काळासाठी सर्वसाधारण महसुली भांडवलातून उभ्या राहिलेल्या भांडवलावर ६ टक्के दराने हिशोबात धरण्यात आला आहे. सन १९६६–६७ पासून लाभांशाच्या या नव्या वाढीव दरामुळे लाभांश म्हणून तसेच, राज्य सरकारांना देण्यासाठी म्हणून करण्यात येणारी १२·५ कोटी रु. ची तरतूद या दोन्ही रकमा एकत्र येतील. लाभांश देण्याच्या या वाढीव दरामुळे लाभांशापोटी १९६६–६७ मध्ये ७ कोटी रु. अधिक द्यावे लागतील. यापैकी बरीच रक्कम राज्य सरकारांनाच मिळणार असून आतापर्यंत राज्य सरकारांना जे १२·५ कोटी रु. मिळत त्याऐवजी चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या प्रत्येक वर्षी १८ कोटी रु. मिळतील.

१९६५–६६ मध्ये २० कोटी, ४० लाख टन मालाची वाहतूक झाली असावी असा अंदाज आहे. आगामी वर्षात त्यामध्ये १ कोटी २० लाख टनांनी वाढ होईल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे माल वाहतुकीचे उत्पन्न ४ अब्ज, ८८ कोटी रुपयांवर जाईल. चालू सालाचा अंदाज ४ अब्ज, ६२ कोटी रुपयांचा आहे आणि फेरबदल लक्षात घेता मालवाहतुकीचे उत्पन्न ५ अब्ज, ६ कोटी रुपये होईल. उतारू वाहतुकीचे उत्पन्न आगामी अर्थवर्षात २ अब्ज, २७ कोटी, २० लाख रुपये येईल. चालू वर्षाचा अंदाज २ अब्ज, २० कोटी, ५० लाख रुपये आहे, शेतकी उत्पादनात आणि उत्पन्नात घट झाल्यामुळे उतारू वाहतुकीमधल्या अपेक्षित वाढीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल, ह्या गोष्टीचा विचार करण्यात आला आहे.

साकल्याने, एकूण वाहतूक उत्पन्नात ७ अब्ज, ९५ कोटी, ३३ लाख रुपयांहून ७ अब्ज, ४१ कोटी, ८० लाख रुपयांपर्यंत वाढ होईल असा अंदाज आहे. रेल्वेवर बंधनकारक असलेले लाभांश वाटल्यानंतर, २२ कोटी, १९ लाख रुपये शिल्लक राहतील.

### सिलोनमधील साप्ताहिक सुट्टी चंद्राच्या कलेने !

सिलोनमध्ये रविवारऐवजी चंद्राच्या कलेप्रमाणे सुट्टी देण्यास जानेवारीत प्रारंभ झाला. बँकांनी ह्याविरुद्ध तक्रार केली आहे. कारण जगांतील इतर देशांतील बँका रविवारी चालू राहणार नाहीत. बुद्धधर्मीयांच्या चळवळीपुढे नमून सरकारने हा बदल केला आहे आणि रोमन कॅथॉलिक चर्चने त्यास मान्यता दिली आहे; कारण रविवारी सर्व ख्रिस्ती नोकरांना व कामगारांना प्रार्थनेसाठी दोन तास सुट्टी दिली जाईल. जानेवारीमध्ये पहिल्या तिन्ही सुट्ट्या गुरुवारी आल्या.

### दारूवर १४६ कोटी रु. खर्च

भारतातील लोक दरसाल १४६ कोटी रुपयांची दारू पितात. त्यापैकी ५२ कोटी रुपयांची दारू बेकायदा गाळलेली असते. परदेशी दारूच्या खपात दिल्लीचा अनुक्रम पहिला लागतो.

### नोकरकपातीचा फार्स

'ओरिसा सरकारने काटकसरीच्या नावाखाली १९६५–६६ मध्ये ६५२ जागा रद्द केल्या, पण ५,७७१ नव्या जागा निर्माण केल्या. रद्द केलेल्या प्रत्येक जागेच्या ठिकाणी नऊ नवीन जागा निर्माण झाल्या.

## आर्थिक मदतीमागची अमेरिकेची भूमिका

अमेरिकेचे उपाध्यक्ष मि. ह्यूबर्ट हंफ्रे ह्यांनी कराची येथे पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री मि. भुत्तो ह्यांच्याशी पाकिस्तानला द्यावयाच्या आर्थिक मदतीबद्दल बोलणी केली. कराचीतील अमेरिकन वकिलातीने मि. हंफ्रे ह्यांच्या बोलण्याबद्दल जी माहिती प्रसिद्ध केली, त्यात पाकिस्तानला चीनच्या धोक्याची जाणीव असल्याचे त्यांना आढळून आले, असे म्हटले आहे. पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री मि. भुत्तो ह्यांनी ह्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले असून, अमेरिकेकडून आर्थिक मदत मिळविण्यासाठी पाकिस्तान आपल्या परराष्ट्रीय धोरणावर कोणतीच बंधने घालून घेणार नाही असा खुलासा केला आहे. त्यांच्या मताने भारतीय उपखंडाला चीनचा धोका कधीच नव्हता, आणि १९६२ साली चीन व भारत ह्यांचा संघर्ष झाल्यावर भारताला अमेरिकेने लष्करी स्वरूपाची मदत दिली असल्यामुळे तर आता तो नाहीसाच झाला आहे. अमेरिकेतील वृत्तपत्रे, रेडिओ आणि दूरदर्शन केंद्रे ह्यांनी मात्र मि. भुत्तो ह्यांच्या खुलाशाला फारसे महत्त्व दिलेले नाही. त्यांच्या मताने पाकिस्तानला चीनच्या धोक्याची जाणीव झालेली आहे. प्रे. आयूबखान आणि प्रे. जॉन्सन ह्यांच्या वॉशिंग्टनमधील वाटाघाटींचा आधार अमेरिकन वृत्तपत्रे घेत आहेत. वॉशिंग्टनमधील एका सरकारी खान्याच्या प्रसंगी बोलतांना प्रे. आयूबखान असे म्हणाले आहेत की, पाकिस्तानचा इतर कोठल्याही देशापेक्षा अमेरिकेवर अधिक विश्वास आहे; इतर बडी राष्ट्रे आज जरी पाकिस्तानशी मित्रत्वाच्या नात्याने वागत असली तरी उद्या ती शत्रूही होण्याची शक्यता आहे; फक्त अमेरिका हेच राष्ट्र विश्वासार्ह आहे. आर्थिक मदत देण्यामागे राजकीय हेतू नसतो असे मदत देणाऱ्या राष्ट्रांकडून नेहमीच सांगण्यात येते; पण वस्तुस्थिती वेगळी असते असाच अनुभव येतो.

---

## दुष्काळाचा तडाखा महाराष्ट्राला सर्वांत अधिक

अपुऱ्या पावसामुळे हिंदमधील निरनिराळ्या राज्यांना दुष्काळाचा कमीअधिक तडाखा बसला असला, तरी महाराष्ट्राला तो अधिक जबर बसला असल्याचे आढळून आले आहे. दुष्काळाच्या तडाख्यात सापडलेली लोकसंख्या आणि खरीप पिकांचे झालेले नुकसान ह्या दोन्ही दृष्टींनी महाराष्ट्र राज्य अधिक अडचणीत सापडलेले आहे. खरीप पिकांची नुकसानी ४६ टक्के इतकी आहे. १९६४–६५ मध्ये महाराष्ट्रात ५४·०९ लाख टन खरीप पिके हाताशी लागली होती. गेल्या वर्षी खरीप पिकाचे उत्पादन अवघे २९·५७ लाख टन झाले आहे. अवर्षणाच्या ह्या जबर तडाख्यात जवळजवळ १·२४ कोटी लोक सापडले आहेत. आसाम व केरळ ही दोन राज्ये सोडून बाकी सर्वच राज्यात खरीप पिके कमी आलेली आहेत. खरीप पिकांची एकूण घट १·७ कोटी टन असावी. मध्य प्रदेशातील खरीप पिकात ३८ टक्के घट झाली असून सुमारे ८८ लाख लोक आपत्तीत सापडले आहेत. ओरिसा राज्य मोठ्या प्रमाणावर तांदूळ पिकविते. पण गेल्या हंगामात तांदुळाचे उत्पादन ४४·८२ लाख टनावरून ३४·६२ लाख टनापर्यंत खाली आले. गुजरात राज्यात खरीप पीक २०·३७ लाख टनापासून १२·६७ लाख टनापर्यंत खाली आले. राजस्थानात तर गेल्या हंगामात अवघे १७·४५ लाख टन अन्नधान्यच हाती लागले. म्हैसूर राज्यात खरीप पिकाच्या उत्पादनातील घट १६ टक्के आहे. उत्तर प्रदेशात जाड्याभरड्या अन्नधान्याचे उत्पादन वाढले आहे. परंतु तांदुळाचे उत्पादन ३·३१ लाख टनांवरून २·१२ लाख टनांपर्यंत खाली आले आहे. खरीप पिकाची एकूण घट १४ टक्के झाली आहे. आंध्र प्रदेशात ज्वारी आणि मका ह्यांचे उत्पादन वाढले असले तरी तांदुळ व बाजरी ह्यांचे उत्पादन घटले आहे.

---

## उच्च शिक्षणाचा फायदा वरिष्ठ वर्गातील मुलांनाच मिळतो

भारताला स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यानंतर शिक्षणाचा प्रसार खूपच झाला आहे. ह्या शिक्षणाचा, विशेषतः उच्च शिक्षणाचा फायदा समाजातील निरनिराळ्या थरांतील मुलांना कसा काय मिळत आहे ह्याची तपासणी करण्याचे शिक्षण-मंडळाने हाती घेतले होते. मंडळाचा अहवाल आता प्रसिद्ध झाला असून त्यामधील माहितीवरून निघणारे निष्कर्ष समाजधुरीणांना काहीसे अस्वस्थ करणारेच म्हणावे लागतील. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात शास्त्रीय विषय, एंजिनिअरिंग आणि वैद्यक ह्या शाखांना नोकऱ्या मिळण्याच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. ह्या तिन्ही विभागांतील शिक्षणाच्या बहुतेक सर्व संधी शहरांतील स्वतंत्र व्यावसायिक, व्यापारी आणि इतर वरिष्ठ वर्ग ह्यांच्या मुलांनाच मिळतो असे मंडळाला आढळून आले आहे. समाजाची आर्थिक प्रगती समतोलपणाने घडविण्याचे काम चालू शिक्षणव्यवस्थेने झालेले नाही. खेडेगावातील रहिवासी म्हणजे मुख्यतः शेतकरी व मजूर ह्या वर्गातील मुले उच्च शिक्षणाच्या वरील तिन्ही विभागांत फारच अल्प प्रमाणात दिसून येतात. मंडळाने आपल्या पाहणीत देशातील ३१७ उच्च तांत्रिक शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांचा समावेश केला होता. पाहणीत ७९,६३१ विद्यार्थ्यांची माहिती मिळविण्यात आली. चांगली नोकरी मिळण्याच्या दृष्टीने ज्या उच्च तांत्रिक शिक्षणसंस्थांची विशेष प्रसिद्धी आहे, त्यांत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी ८५·५ टक्के विद्यार्थी मोठ्या शहरांतून व गावांतून आलेले होते. तांत्रिक शिक्षणाच्या इतर संस्थांतूनही शहरी व ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांचे प्रमाण बरेच विषम आढळून आले. फक्त शेतकी कॉलेजे आणि तांत्रिक प्रशिक्षण संस्था ह्यांतील ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रमाण अनुक्रमे ५८ व ६०·८ टक्के आढळून आले.

---

## रेल्वेच्या सामग्रीची निर्यात शक्य

भारतात रेल्वेला लागणारे साहित्य आता भरपूर निर्माण होत असल्याने त्याच्या उत्पादनातील काही भाग परदेशात निर्यात करता येणे शक्य होणार आहे. हिंदमध्ये तयार करण्यात आलेले मालवाहू आणि प्रवासी डबे परदेशात पाठविता येण्यासारखे आहेत. पाकिस्तान व अर्जेंटायना ह्या दोन देशांनी रेल्वेच्या मालाची टेंडर्स मागविली होती. भारताने भरलेली टेंडर्स सर्वांत कमी किंमतीची होती. हिंदच्या मालाचा दर्जाही चांगला असतो. भारतामधील रेल्वेच्या एंजिनांना मात्र परदेशी मागणी नाही. कारण कित्येक देशांतून रेल्वे मार्गावर वाफेची एंजिने वापरण्याचे बंद केले आहे अगर तसे करण्याची तयारी चालू आहे. हिंदमधील पोलादाच्या कारखान्यांकडे रेल्वेकडून करण्यात आलेल्या सर्व मागण्या गेल्या दोन–तीन वर्षांत कारखान्यांनी पुऱ्या केल्या नाहीत.

### ह्या द्रष्ट्याचे स्मारक आहे काय ?

लोकसंख्येच्या भरमसाठ वाढीचा प्रश्न आजच्या जगाला भेडसावीत आहे. ह्या प्रश्नाच्या गंभीरपणाची जाणीव अर्थ-शास्त्रज्ञांना अलीकडे वारंवार होत असली तरी त्यासंबंधी पहिला इषारा सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ थॉमस रॉबर्ट माल्थस ह्याने दिला होता हे प्रसिद्ध्च आहे. माल्थसचा जन्म होऊन गेल्या १७ दिनांकास २०० वर्षे पूर्ण झाली. लोकसंख्येच्या प्रश्नासंबंधीचा निबंध त्याने प्रथम १७९८ साली निनावी प्रसिद्ध केला. त्या निबंधाने त्या वेळी सुद्धा खूप खळबळ उडवून दिली होती. त्यानंतर त्याने ह्या विषयाचा अधिक खोलवर अभ्यास केला आणि आपल्या सिद्धांताच्या समर्थनार्थ आणखी पुरावा गोळा केला. १८०३ साली त्याने सिद्धांताची नवी आवृत्ती तयार करून ती स्वतःच्या नांवावर प्रसिद्ध केली. माल्थसचा सिद्धांत असा आहे की, लोकसंख्येची वाढ अनिर्बंधपणे होत गेली तर तिच्या वाढीची गती आणि अन्नपदार्थांच्या उत्पादनाची गती ह्यांच्यांत व्यस्त प्रमाण होत जाते. माल्थसच्या सिद्धांताचा अनुभव पश्चिम युरोपातील देशांतून आला नाही. कारण, त्या देशांतून औद्योगिक व शेतीच्या उत्पादनात झपाट्याने वाढ झाली. तथापि आशिया आणि आफ्रिका ह्या देशांतील परिस्थितीत त्याचा सिद्धांत तीव्रतेने अनुभवास येत आहे असे म्हणण्यास हरकत नाही. ह्या खंडातील बहुतेक देश मागासलेले आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर होत असले तरी ते अपुरे पडत आहेत. उत्पादनात वाढ होण्याच्या आधीच लोकसंख्या विलक्षण गतीने वाढलेली आहे. परिणामी चिखलांत रुतलेल्या माणसाने आपल्याच वहाणेचा अंगठा धरून स्वतःस वर खेचण्याचा प्रयत्य करण्यासारखे दृश्य दिसत आहे.

### शेती कंपन्यांची कल्पना बारगळली

हिंदमधील अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याची अत्यंत आवश्यकता असल्याने नियोजन समितीने सार्वजनिक भांडवलाच्या शेतीकंपन्या काढण्याची कल्पना प्रसृत केली होती. ह्या संकल्पित कंपन्यांना लागवडीखाली असणारी जमीन घेण्याची मात्र परवानगी देण्यात येणार नव्हती. पडीक असलेल्या जमिनी लागवडीखाली आणण्याची मुभा त्यांना देण्यात यावयाची होती. मोठ्या प्रमाणावर शेती केल्याशिवाय ती आधुनिक पद्धतीने करता येत नाही म्हणून ही कल्पना निघाली होती. पण, आता ही कल्पना बारगळली असल्याचे समजते. नियोजन समिति आणि संबंधित मध्यवर्ती सरकारची खाती ह्यांच्या दरम्यान ह्या कल्पनेसंबंधी अलीकडेच चर्चा झाली आणि तिला कायमची मूठमाती देण्यात आली. हिंदमधील शेतकऱ्यांत छोट्या शेतजमिनीच्या मालकांची संख्या अधिक आहे. त्यांच्या मनात ह्या नव्या उपक्रमाने चलबिचल होईल अशी भीती चर्चेत व्यक्त करण्यात आली. ह्या कल्पनेला देशात कोठेच फारसा प्रतिसाद मिळाला नाही. कारण, अनेक राज्यांतून कमाल जमीन धारणेचे कायदे आहेत अगर होत आहेत. कष्टाने लागवडीस आणलेली जमीन सरकार कायदा करून ताब्यात घेण्याची भीती सर्वत्र पसरलेली आहे. शेतीच्या भांडवलशाही कंपन्या काढण्यास खुद्द काँग्रेस पक्षातील काही गटांचाही विरोध होताच. विरोधी पक्षांचाही विरोध होता. देशातील उद्योगधंद्यावर मूठभर उद्योगपतींची पकड आहेच. त्यानाच आता शेतीवरही आपले नियंत्रण बसविण्याची संधी देण्यात येत आहे अशी टीका करण्यात येत होती. पंजाबमध्ये एका प्रख्यात उद्योगगटाने मोठी शेती करण्यास प्रारंभ केला आहे. ह्या शेतीत फक्त बियाणांचे उत्पादन करण्यात येत असल्यामुळे तिचा मात्र अपवाद करण्यात आला आहे.

### १९६४–६५ सालांत निर्यातीचा उच्चांक

हिंदमधील आर्थिक परिस्थितीवर बराच ताण पडलेला असला तरी १९६४–६५ सालांत निर्यातीने उच्चांक गाठलेला आहे. निर्यात मालाची एकूण किंमत ८१५ कोटी रुपयांची झाली. हा आकडा मागील वर्षांच्या मानाने २२ कोटी रुपयांनी अधिक आहे. आयात–निर्यात व्यापारावर नियंत्रण ठेवणाऱ्या संघटनेच्या वार्षिक अहवालांत ही माहिती नमूद करण्यात आलेली आहे. निर्यात वाढविण्याचे सरकारचे प्रयत्न चालूच आहेत. हे लक्षात घेता १९६५–६६ साली निर्यातीची किंमत अधिकच होईल असा अंदाज करण्यात येत आहे. १९६५–६६ हे साल तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतील अखेरचे आहे. १९६५–६६ च्या एकूण निर्यातीपैकी ५४·४ टक्के निर्यात प्राथमिक स्वरूपाच्या मालाची झाली. त्याची किंमत ४४० कोटी रुपये झाली. ह्या मालात अन्नपदार्थ, पेये, तंबाखू, कच्चा माल, इत्यादींचा समावेश आहे. पक्या मालाच्या निर्यातीची टक्केवारी ४५·१ आणि किंमत ३६६ कोटी रुपये भरली. ह्या मालात सुती कापड, तागाचा माल इत्यादींचा समावेश आहे. पूर्व युरोपातील देशांनी भारताची १७·७ टक्के निर्यात घेतली. तिची किंमत १४४ कोटी रुपये झाली. पूर्व युरोपातील देशांना होणाऱ्या निर्यातीत वाढ होण्याची प्रवृत्ती विशेष दिसून आली. रशियाला करण्यात येणाऱ्या निर्यातीत २५·८ कोटी रुपये किंमतीच्या मालाची वाढ झाली. अमेरिकेला करण्यात आलेल्या निर्यातीत १५·२ कोटी रुपयांची आणि ब्रिटनला करण्यात आलेल्या निर्यातीत ३ कोटी रुपयांची वाढ झाली. आयात–निर्यात व्यापारातील तफावत मागील वर्षांच्या मानाने १८ कोटी रुपये तुटीची होती. ह्या सालात आयात–निर्यात व्यापारासाठी संघटनेकडे ३ लाख, २४ हजार अर्ज आले होते.

### अलिप्त देशांना चीनची मदत बंद

आशिया आणि आफ्रिका ह्या खंडांतील जे देश राजकीय अलिप्ततेचे धोरण अंमलात आणीत आहेत त्यांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत चीनने बरीच कपात केल्याचे आढळून आले आहे. १९६४ मध्ये चीनने परदेशांना मदत करण्यासाठी ३३ कोटी डॉलर्सची तरतूद केली होती. १९६५ मध्ये मदतीचा आकडा अवघा ५ कोटी डॉलर्सपर्यंत खाली आला आहे. स्वतःचे राजकीय महत्त्व वाढविण्यासाठी चीन आर्थिक मदतीचा उपयोग करीत होता. परंतु ह्या बाबतीत त्याची निराशा झाली आहे. त्यामुळे १९६६ मध्ये तर इंडोनेशिआ, संयुक्त-अरब प्रजासत्ताक, सीरिआ आणि मध्य आफ्रिकेतील नवी प्रजासत्ताक राज्ये ह्यांना देण्यात येणाऱ्या मदतीत आणखीच कपात होण्याची शक्यता आहे.

---

**दुधाच्या भुकटीची मदत**—पश्चिम जर्मन सरकारने भारतामधील अन्नटंचाईला तोंड देण्यासाठी मदत देण्याचे प्रयत्न चालविले आहेत. मदतीच्या कार्यक्रमातील एक भाग म्हणून १ लाख पौंडांची दुधाची भुकटी भारताला पाठविण्यात येणार आहे. त्याशिवाय भारतामधील शेतीसंघटना आणि केंद्रे ह्यांचा विस्तार करण्यासाठीही मदत देण्यात येणार आहे. जर्मनीमधील शेतकऱ्यांना ह्या बाबतीत सहकार्याची विनंती करण्यात आली आहे.

## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] ७, बुधभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०२

( १ ) बचत खाते :—व्याजाचा : दर द. सा. द. शे रु. ४=००

( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध

( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

*अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.*

मॅनेजर—**ना. शं. कानिटकर**

## अल्पबचत योजना आता अधिक लाभदायक

पोस्ट ऑफिस बचत बँकेची खाती

वैयक्तिक खात्यावरील २५ हजार रुपयांपर्यंत व संयुक्त खात्यावरील ५० हजार रुपयांपर्यंतच्या ठेवीवर करमुक्त ४ टक्के व्याज. कितीही वेळा पैसे काढता येतात. चेकबुकची सोय उपलब्ध. सार्वजनिक संस्थांच्या खात्यावर सरसकट ३½ टक्के करमुक्त व्याज व पैसे ठेवण्याला मर्यादा नाही.

आता व्याजाचा दर ४%

### संचित मुदतीच्या ठेवीची योजना

१ एप्रिल १९६५ रोजी अथवा त्यानंतर उघडण्यात येणाऱ्या संचित मुदतीच्या खात्यावर आता मुदती-अंती करमुक्त बोनसही मिळेल.

दरमहा १० रुपये जमा करणाऱ्यास ५ वर्षांच्या खात्यावर १५ रुपये, १० वर्षांच्या खात्यावर ५० रुपये आणि १५ वर्षांच्या खात्यावर १०० रुपये बोनस मिळेल. सर्व ठेवींच्या बाबतीत याच प्रमाणात बोनस मिळेल. १० आणि १५ वर्षांची खाती उघडणाऱ्या व्यक्तींना प्राप्तीकरात सवलत मिळते.

आता बोनसही मिळेल

### नवीन बचत योजना ८%

### राष्ट्रीय बचत सर्टिफिकिटे

[प्रारंभिक विक्री]

ही सर्टिफिकिटे १०, १०० आणि १००० रुपयांच्या दर्शनी किंमतीत बचत बँकेचा व्यवहार करणाऱ्या सर्व पोस्ट ऑफिसातून १ जून १९६५ पासून विकत मिळतील.

या सर्टिफिकिटांची मुदत १० वर्षांची राहील व मुदतीअंती त्यावर ८ टक्के दराचे व्याज मिळेल, म्हणजे १००० रुपयांचे १८०० रुपये मिळतील. व्याजावर प्राप्तीकर आकारला जाईल.

पांच वर्षे मुदतीचे बिनव्याजी बक्षीस रोखे देऊन त्याबद्दल तुम्हांला ही सर्टिफिकिटे घेता येतील.

### करमुक्त उत्पन्नासाठी पुढील दीर्घ मुदतीच्या सर्टिफिकिटांत पैसे गुंतवा

* १० वर्षांची डिफेन्स डिपॉझिट सर्टिफिकिटे. यावर ४.५ टक्के दराचे करमुक्त व्याज मिळते.
* १२ वर्षांची राष्ट्रीय संरक्षण सर्टिफिकिटे. यावर ६.२५ टक्के दराचे करमुक्त व्याज मिळते.

SMALL SAVINGS ★ SAVE THE STATE & YOUR FAMILY ★

राष्ट्राच्या विकासासाठी आणि तुमच्या सुरक्षिततेसाठी अल्पबचतीत अधिकाधिक रक्कम गुंतवा

अल्पबचत संचालनालय, महाराष्ट्र शासन, सचिवालय, मुंबई-३२

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ **माकडछाप** म्हणजेच **काळी टूथ पावडर** ★


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.